# ई-बूक

# कसे

# बनते?

## V 1.0

ई साहित्य प्रतिष्ठान

# ई- बुक म्हणजे नक्की काय ?

*एके काळी पुस्तकं हातानी लिहीली जायची एक प्रत बनवायला लागणारा कालावधी वर्ष दोन वर्षाचा असायचा आणि त्यामूळे होणारा ज्ञानाचा प्रसार ही संक्षिप्त स्वरुपाचा होता, छापखाने आले आणि ज्ञानाचं हे दालन जनसामान्यांना खुलं झालं. अशीच काहीशी क्रांती आता ई-बुक्स आणत आहेत. ई-बुक्स म्हणजे इलेक्ट्रौनिक पुस्तक , सोप्पं सांगायचं झालंतर इंटरनेट वर दिसणारं पुस्तक*

*अगदी तुम्ही औक्सफोर्ड डिक्शनरी चे चाहते असाल तर त्यात दिलेला ई-बुक या शब्दाचा अर्थ*

***"छापिल स्वरुपात प्रकाशित झालेल्या पुस्तकाची इलेक्ट्रौनिक स्वरुपातील आवृत्ती "***

*ई-बुक्स वाचण्यासाठी संगणक, ई-बुक रिडर्स तसेच आजकाल च्या आधुनिक मोबाईल फ़ोन्स चाही वापर केला जातो.*

# ई-बुक्स ची सुरुवात

*१९७१ साली मायकल हार्ट नावाच्या व्यक्तीने अमेरिकेतील इलिनियौस युनिव्हर्सिटीमध्ये संशोधन करत असताना मिळालेल्या संगणकाच्या अमर्यादित वापराच्या परवानगीचा उपयोग सामान्य लोकांच्या हितासाठी करायचे ठरवले आणि " प्रोजेक्ट गुटेनबर्ग " नावाने ई-बुक्स चा पहिला प्रवेश या जगतात झाला. या प्रोजेक्ट मध्ये मायकल चं पहिलं लक्ष होतं २००० सालापर्यंत १०००० छापिल पुस्तकांचं ई-आवृत्तीत रुपांतरण . अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याने या प्रोजेक्ट ची सुरुवात झाली. डिसेंबर २००९ पर्यंत ३०००० पुस्तकांची ई-आवृत्ती या प्रोजेक्टखाली प्रकाशित झाली आहे.*

# ई बुकाची निर्मीती

ई-बुक तयार करणं फ़ारच सोप्पं झालंय !
नवनवीन सोप्या टंकलेखनाच्या पद्धती, सुधारीत वर्ड प्रोसेसर्स आणि सोप्पे इमेज एडिटींग टूल्स यामुळे एखादं ईबुक बनवणं
त्याची बांधणी आणि सजावट करणं हे फ़ारच सोपं झालंय. वरील ३ टूल्स वापरायला शिकून अगदी कॉणीही संगणकाचं सामान्य ज्ञान असणारा ई-बुक तयार करु शकतो. अश्या ई-बुक्स साठी .txt .pdf .doc असे अनेक format प्रसिद्ध आहेत.

# ई-बुक्स चं वितरण

*अशा ई-बुक्स लोकांपर्यंत पोहचणार कश्या ? या प्रश्नाचं उत्तर ही तितकंच सोप्पं आहे , या ईबुकांच्या फ़ाईल्स इमेल द्वारे वितरीत केल्या जाऊ शकतात. तसेच त्या फ़ाईल्स एका पर्यायी वेबसाईट वर ठेऊन तिथून इतर लोक त्या डाऊनलोड करुन घेऊ शकतात. म्हणजेच या वितरणाचा खर्च जवळ जवळ काहीच नाही*

# ई-बुक्स कशासाठी ?

*आधुनिक तंत्रज्ञानामुळे अधिकाधिक लोकांपर्यंत साहित्य पोहचवण्यासाठी जसा ई-बुक्स उपयोग आहे तसाच तो पुस्तकाच्या निर्मीतीतील खर्चाच्या कपातीचा ही आहे. तसेच वितरणासाठी लागणारा अत्यल्प वेळ, वाचकांशी संवाद साधण्याची सोपी सोय*
*अशा अनेक कारणांमुळे ई-बुक्स रातोरात लोकप्रिय होत आहेत.*

*पारंपारिक छापिल पुस्तकाची एक आवृत्ती असते १८०० प्रतींची आणि ईबुक ला मर्यादाच नाही . आपलं साहित्य जगभर पोहचवण्याचा हा एक ताकदवान पर्याय उभा राहतोय.*

# तुम्ही लेखक/कवी आहात ?
# तुम्हाला तुमचं ई-बूक करायचंय ?

तुम्हाला स्वतःला संगणक हाताळता येत असेल आणि मायक्रोसॉफ़्ट वर्ड थोडफ़ार वापरता येत असेल, तर तुम्ही स्वतः घरच्याघरी स्वतःचं ई-बूक बनवू शकता, आणि हे ईबूक तुम्हाला तुमचं ईबूक बनवायला मदत करेल.

## सुरुवात करण्याआधी

## या गोष्टी तुमच्याकडे हव्या

१. मराठी टायपिंग टूल (बरहा किंवा इतर )

२. वर्ड प्रोसेसर (मायक्रोसॉफ़्ट ऑफ़िस २००७ किंवा नवीन )

३. इंटरनेट कनेक्शन

४. इमेज एडिटर (फोटोशॉप किंवा जिम्प) *

५. पीडीएफ़ कनव्हर्टर ( ॲडोब किंवा इतर )

*- इमेज एडिटर ऐवजी वर्ड मधल्या सोई वापरणे सुरुवातीस सोपे जाईल

**मराठी टायपिंग टूल**

तुमचं साहित्य मराठी लिपीमध्ये टाईप करण्यासाठी तुम्हाला मराठी टायपिंग टूल लागणार आहे. इंटरनेट वरती बरीच मराठी टायपिंग टूल्स फ़ुकटात उपलब्ध आहेत त्यांचा वापर तुम्ही करू शकता. मराठी मध्ये टाईप कसं करायचं यासाठी ई-साहित्य चं ई-बूक ई-शाळा भाग पहिला पहा

बरहा चं मराठी टूल प्रसिद्ध आहे वापरण्यास सोपे आणि फ़ुकटात उपलब्ध

हे इथे मिळेल

http://www.baraha.com/download/download.php?File=BarahaSetup-10.4.exe

याची माहीती येथे पहा

http://www.baraha.com/help/BarahaIME/index.htm

ई-शाळा ईबूक येथे मिळेल

http://www.esahity.com/2010/10/blog-post_2346.html

## वर्ड प्रोसेसर

तुमच्या साहित्याची मांडणी, सजावट करण्यासाठी वर्ड प्रोसेसर अत्यंत आवश्यक आहे. मायक्रोसॉफ़्ट चा वर्ड हा अत्यंत प्रसिद्ध वर्ड प्रोसेसर आहे. यातल्या ब-याच सुविधा तुम्हाला तुमचं ई-बूक बनवण्यास फ़ार उपयोगी पडतात. २००७ किंवा त्या पुढील आवृत्ती असल्यास उत्तम.

याला फ़ुकट पर्याय ही उपलब्ध आहेत

१. अबिवर्ड - http://www.abisource.com/download/

२. ओपनऑफ़िस – http://download.openoffice.org/contribute.html?download=mirrorbrain&files/stable/3.3.0/OOo_3.3.0_Win_x86_install-wJRE_en-US.exe

# इंटरनेट कनेक्शन

ईबुक्स च्या तयारीपासून वितरणापर्यंत सर्व कामात मदत करणारा आपला एकमेव दोस्त म्हणजे इंटरनेट. अनलिमिटेड कनेक्शन असेल तर जिगरी दोस्तंच म्हणा ☺

**स्पीड किती असावा ?**

कमीत कमी २५६ केबीपीएस

**कशासाठी ?**

ईबूक सजवण्यासाठी लागणारी चित्रे शोधण्यासाठी

ई-बूक च्या वितरणासाठी ( अपलोड किंवा मेलींग लिस्ट )

इमेज एडिटर

हा तुमच्या ई-बुकाच्या सजावटीत कामी येतो. तुमच्या ई-बुकाच्या आकर्षक मुखपृष्ठाची जबाबदारी उचलणारा महत्वपुर्ण सभासद. फ़ोटोशॉप हा प्रसिद्ध असलेला इमेज एडिटर आहे त्यास त्याच तोडीचा फ़ुकटात उपलब्ध असलेला पर्याय म्हणजे जिम्प.


याचा उपयोग चित्राला योग्य आकारात कापण्यासाठी, त्याला वेगवेगळे आकर्षक इफ़ेक्ट्स देण्यासाठी केला जातो.

सुरुवातीला या सोई वर्ड मध्ये उपलब्ध आहेत आपण त्यांचाच उपयोग करुया.

पीडीएफ़ कन्व्हर्टर

तुमचं ईबूक वितरीत करण्यासाठी तुम्हाला ते पीडीएफ़ या प्रकारात रुपांतरीत करावं लागेल ज्यायोगे त्या ईबुकामध्ये वाचकाला बदल करता येणार नाही.

यासाठी वर्ड २००७ मध्ये सेव्ह चा पर्याय आहे.




किंवा **CutePDF** हा फ़ुकट पर्याय येथून मिळेल

http://www.cutepdf.com/download/CuteWriter.exe

**ईबुक किती पानांचं असावं ?**

ई-बूकात किती पानं असावी याला कमीतकमी १ आणि जास्तीत जास्त कितीही.. असंच उत्तर आहे.

आपण कितीही पानांचं ई-बूक करू शकतो फ़क्त त्या ई-बूकच्या फ़ाईल ची साईज १ एमबी पेक्षा कमी असावी.

**ई-बूक बनविण्यास किती वेळ लागतो ?**

काही रिकामे तास..

**एक ई-बूक बनवूया**

ई-बूक कशाचं बनवायचं ?

ई-बूक बनवण्यासाठी त्याचा गाभा अर्थात कथा कविता लेख किंवा तत्सम साहित्य उपलब्ध असायला हवं, अर्थात स्वतःचं ईबूक बनवणार आहात तर ते साहित्य ही स्वतःचंच हवं ☺

तुम्ही तुमच्या एखाद्या मित्राच्या कवितांचंही ई-बूक बनवू शकता आणि त्याला गिफ़्ट करू शकता.

कवी मित्र सचिन काकडे याची निरोप ही कविता याचं ई-बूक आपण बनवूया

http://sachinkakade.wordpress.com/2009/08/13/%E0%A4%A8%E0%A4%BF%E0%A4%B0%E0%A5%8B%E0%A4%AA/


सर्वप्रथम ६ कडव्यांच्या या कवितेचे ८ पानांचे ईबूक आपण बनवूया , प्रत्येक कडव्यासाठी १ पान , एक मुखपृष्ठ आणि एक शेवटाचं आभाराचं/माहीतीचं पान

तुम्ही सुरुवातीस असंच काही छोटसं निवडा ई-बूक बनविण्यासाठी

पानाची साईज निवडणे-


हे एक छोटसं ई-बूक असणार आहे त्यामुळे आपण पानाची साईज छोटीच ठेवूया

वर्ड मध्ये मूळ अ४ साइज आपल्या ई-बूक साठी मोठी होईल कारण एका पानावर एक चार ओळींचं कडवं फ़क्त येईल मग आपण अ५ ही साईज निवडूया




पेज ओरिएन्टेशन –

या मध्ये पोर्ट्रेट(उभे पुस्तक) आणी लॅण्ड्स्केप(आडवे) असे दोन पर्याय आहेत. या पुस्तकासाठी आपण लॅण्ड्स्केप हा पर्याय निवडूया





आता तुमचे पान असे दिसु लागेल,



**मुखपृष्ठ**


इथे ई-बुक चं नाव म्हणजेच कवितेचं नाव ‘निरोप’ हे मुखपृष्ठावर येईल त्यासोबत त्याच्या मागे त्याला साजेसं एखादं चित्र आपण टाकूयात


सर्वप्रथम पुस्तकाचं नाव या पहिल्या पानावर मराठीत टाईप करा ( निरोप )





नावाची फ़ॉन्ट साईज हवी तेवढी वाढवून घ्या,

नाव आपल्याला पानावर हवे तिथे ठेऊन घ्या जर आपल्याला नावास आकर्षक स्वरूप द्यायचे असेल तर वर्ड आर्ट चा उपयोग आपण करू शकतो


Document2 - Microsoft Word
WordArt
Insert decorative text in your document.
Press F1 for more help.
निरोप



Document2 - Microsoft Word
Edit WordArt Text
Times New Roman
निरोप
निरोप
OK
Cancel


Document2 - Microsoft Word
WordArt Tools
Format
निरोप

**आता** आपण या नावाला साजेसं चित्र शोधुया


या साठी आपण गुगल सर्च या इंटरनेट साईट चा उपयोग करुयात,

चित्र शोधताना तुम्ही निरोप या शब्दासाठी पर्यायी ईंग्रजी शब्द म्हणजे गूडबाय वापरू शकता किंवा पुढे जाऊन ती संकल्पना वेगळ्या शब्दात शोधू शकता. इथे तुम्हाला सापडणारी चित्रे तुम्ही शोधणा-या शब्दावर अवलंबून असतील. त्यामुळे तुम्ही काय शोधत आहात हे महत्वाचं





गुगल सर्च च्या डाव्या कोप-यात इमेजेस हा पर्याय निवडा ज्या योगे आपण चित्र शोधू शकतो दिलेल्या शब्दाला आधारित असणारी









आता या ऐवजी आपण एखादी पाठमोरी मुलगी शोधुया जी या विषयास शोभून दिसेल





हे चित्र आपण निवडूया आपल्या मुखपृष्ठासाठी, ते चित्र सेव्ह करुन घ्या, सेव्ह करण्यासाठी त्या चित्रावर राईट क्लिक करून सेव्ह इमेज पर्याय निवडा

आता ते चित्र आपल्या ई-बुकाच्या नावाच्या मागे कसे टाकायचे ते शिकुया





इन्सर्ट मेनुमधुन पिक्चर हा पर्याय निवडा आणि आपण सेव्ह केलेले चित्र निवडा




त्या नंतर त्या चित्रास राईट क्लिक करून
Text wrapping मेनुमधुन behind text हा
पर्याय निवडा,




आता कोपरे धरून त्या चित्राला पानभर पसरून घ्या आणि त्या चित्राप्रमाणे नावाच्या जागेत अथवा रंगसंगतीमध्ये योग्य तो बदल करा,

रंगसंगतीसाठी नावास क्लिक केल्यावर येणा-या वर्ड आर्ट टूल्स फ़ॉरमॅट मेनुचा उपयोग करा येथील शॅडो या टूल चा वापर करून नावाची सावली येथे दाखवली आहे







याच बरोबर या मुखपृष्ठावर लेखकाचे नाव आणि प्रकाशकाचा लोगो सुद्धा तुम्ही टाकू शकता,


लेखकाचे नाव टाकण्याकरिता इन्सर्ट मेनुमधुन टेक्स्ट बॉक्स निवडा आणि त्यात लेखकाचे नाव लिहून योग्य जागी चिकटवा


आणि प्रकाशकाचा लोगो टाकण्यासाठी इन्सर्ट मेनूमधून पिक्चर हा पर्याय निवडून त्यातून लोगोची इमेज निवडा



याच प्रमाणे पुढील कवितेची पानं सुद्धा तुम्ही सजवू शकता प्रत्येक पानावर त्या मजकुराला साजेसं असं चित्र निवडा













आणि शेवटच्या पानावर लेखकाची माहीती , ईमेल पत्ता फ़ोन नंबर ईत्यादी माहीती देऊ शकतो.

## पीडीएफ़ करणे


या नंतर शेवटचा टप्पा या तयार केलेल्या वर्ड फ़ाईल ला पीडीएफ़ मध्ये बदलणे ज्यामुळे तुमच्या ईबूक मध्ये इतर कुणी बदल करू शकणार नाही.

यासाठी तुम्ही आधी सांगितल्याप्रमाणे क्युट पीडीएफ़ तुमच्या संगणकावर इन्स्टॉल केले असेल तर पुढील प्रमाणे तुम्ही तुमच्या ईबुकास पीडीएफ़ मध्ये सेव्ह करु शकता


मेन मेनुमधुन प्रिंट हा ऑप्शन सिलेक्ट करा



प्रिंट मेनुमधुन क्युट रायटर हा पर्याय निवडा आणि ओके या बटणावर क्लिक करा



करा या नंतरच्या सेव्ह मेनुमध्ये तुमच्या ईबुकाच्या पीडीएफ़ फ़ाईल ला नाव द्या आणि सेव्ह करा.




अशा प्रकारे तुम्ही तुमचं पहिलं ईबूक तयार केलंत.

याच पद्धतीने तुम्ही तुमचं कथा, कादंबरी, कविता संग्रह असं कोणतही ईबूक बनवू शकता.

या ईबूक चे वितरण तुम्ही तुमच्या ईमेल द्वारे करू शकता. तुमच्या मित्रांपर्यंत पोहचवू शकता आणि त्यांना ही पुढे वितरण करण्याचे आव्हान करु शकता.

ई-साहित्य प्रतिष्ठान नवनव्या दर्जेदार मराठी ईबुक्स चे मोफ़त वितरण करते. जगभरातल्या एक लाखाहून अधिक वाचकांपर्यंत ई-साहित्य प्रतिष्ठानची पोहोच आहे. तुमचे ई-बूक तुम्ही आम्हास मेल करू शकता आमच्या पसंतीस उतरल्यास आणि नियमात बसल्यास आम्ही त्याचे मोफ़त वितरण करु.

तुमच्या ई-बुक क्षेत्रातील वाटचालीस
ई-साहित्य प्रतिष्ठान च्या कोटी कोटी शुभेच्छा !

शुभास्ते पंथानः सन्तू !

प्रकाशक –

www.esahity.com esahity@gmail.com